राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या सहकारी सूतगिरण्यांना अर्थसहाय्य करण्याच्या विविध योजना राज्यात लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक : सूतगि-११२०००/प्र.क्र.१२१/टेक्स-१,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १७ नोव्हेंबर, २०००.

**प्रस्तावना :-**

राज्याची मर्यादित साधनसामुग्री लक्षांत घेता प्रस्थापित तसेच उभारणी खाली असलेल्या सहकारी सूतगिरण्यांना विविध बाबींसाठी अर्थसहाय्य करणे शासनास शक्य होत नाही, म्हणून राष्ट्रीय सहकारी विकास निगमांकडून अर्थसहाय्य मिळवून सहकारी सूतगिरण्यांचे आधुनिकीकरण, विस्तारीकरण, पुनर्वसन तसेच उभारणीखालील गिरण्यांना शासकीय भागभांडवल यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. यासंदर्भात निगमाने जाहिर केलेल्या योजना राज्यात लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सहकारी सूतगिरण्यांना त्यांच्या आधुनिकीकरण, विस्तारीकरण, पुनर्वसन व उभारणी करण्यासाठी आवश्यक असणारे अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या दिनांक १५.३.२००० च्या परिपत्रकान्वये जाहिर केलेल्या व निगमाच्या दिनांक ३.७.२००० च्या पत्रान्वये विश्लेषित केलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या विविध योजना राज्यात लागू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. या योजनांप्रमाणे प्रकल्प किंमतीनुसार राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या योजनेतंर्गत अर्थसहाय्याचा आकृतिबंध परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविण्यात आला आहे, आकृतिबंध योजनानिहाय वेगवेगळा राहणार आहे. या आकृतिबंधानुसार राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने गिरण्यांच्या प्रकल्पास मान्यता दिल्यानंतर राष्ट्रीय सहकारी विकास निगमांच्या अटी व शर्तीनुसार गिरणीस अर्थसहाय्य मंजूर करण्यात येईल. अर्थसहाय्य मंजूर करतेवेळी निगमाच्या योजनानिहाय अटी व शर्ती संबंधित सहकारी सूतगिरणीवर बंधनकारक राहतील.

३. निगमाच्या अटी व शर्तीनुसार गिरणीने निगमाच्या ज्या योजनांचा लाभ घेण्याचे ठरविले आहे, त्या योजनांसाठी आवश्यक असणारे सभासद भागभांडवल गिरणीने जमा करणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या योजनेचा लाभ घेणेसाठी विविध योजने अंतर्गत एकदा प्रकल्प शासनास सादर केल्यानंतर व त्यास शासनाने मंजुरी दिल्यानंतर प्रकल्प खर्चामध्ये होणारी वाढ

शासनामार्फत विचारात घेतली जाणार नाही, मूळ प्रकल्पानुसार आवश्यक अर्थसहाय्य गिरणीस करण्यात येईल.

४. आठव्या पंचवार्षिक योजनेपूर्वीच्या गिरण्यांनी आधुनिकीकरण, विस्तारीकरण, पुनर्वसन यासाठी तयार केलेला प्रकल्प अहवाल शासनास सादर करण्यापूर्वी या प्रकल्प अहवालास संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांची शिफारस घेणे आवश्यक राहील.

५. गिरणी संबंधित योजने अंतर्गत अर्थसहाय्य मिळण्यास पात्र आहे किंवा कसे याबाबत संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सखोल छाननी करणे आवश्यक आहे. आधुनिकीकरणासाठी/विस्तारीकरणासाठी व पुनर्वसनासाठी सादर केलेले प्रस्ताव तांत्रिकदृष्टीने योग्य आहे किंवा कसे, तसेच गिरणीने शासकीय दायित्वाची परतफेड केली आहे किंवा नाही या बाबी प्रकल्पनिहाय शिफारशीत उल्लेख करावयाचा आहे. सहकारी सूतगिरण्यांसाठी पुनर्वसनाची निगमाच्या अर्थसहाय्याची योजना ही पॅकेज स्वरुपात असल्याने आजारी गिरण्याचे पुनर्वसन प्रस्तावित करतांना, गिरणीस किमान अर्थसहाय्य शासनस्तरावरुन किती आवश्यक राहील याबाबत संचालकांनी वस्तुनिष्ठ अहवाल शासनास सादर करणे आवश्यक आहे. व त्यादृष्टीने छाननी केल्याशिवाय प्रस्ताव निगमाकडे शिफारशीसाठी विचारात घेण्यात येणार नाहीत.

६. निगमाच्या या योजने अंतर्गत सहकारी सूतगिरण्यांना मिळालेले अर्थसहाय्य संबंधित प्रकल्प पूर्ण करण्यासाठीच उपयोगात आणणे संस्थेवर बंधनकारक राहील. या अर्थसहाय्याचा दुरुपयोग केल्यास संस्थेच्या संचालक मंडळावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. व संस्थेला दिलेले अर्थसहाय्य एक रक्कमी वसूल करण्यात येईल. व अशा प्रकरणी संबंधित संस्थेच्या संचालकांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल.

७. आठव्या पंचवार्षिक योजना काळातील उभारणी खालील गिरण्यांना त्यांच्या प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक असलेले शासकीय भागभांडवल उपलब्ध करुन देण्यासाठी निगमाच्या नवीन योजनासाठी प्रस्तावित असलेल्या अर्थसहाय्याच्या आकृतिबंधानुसार अर्थसहाय्य सहकारी सूतगिरण्यांना देण्यात येणार नसून या गिरण्यांना निगमाची विस्तारीकरणाची योजना लागू राहील. व या योजनेखाली गिरण्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. या योजनेचा लाभ गिरण्यांना देतांना राष्ट्रीय सहकारी विकास निगमाकडून आकृतिबंधानुसार प्राप्त होणारे गुंतवणूक कर्ज संबंधित गिरण्यांना शासकीय भागभांडवल म्हणून वितरीत करण्यात येणार आहे. शासकीय भागभांडवलापोटी करण्यात येणारे अर्थसहाय्य त्या गिरणीच्या प्रकल्प उभारणीसाठीच वापरण्यात येणार आहे, याबाबत संचालकांनी अत्यंत सतर्क असणे आवश्यक आहे. तसेच गिरण्यांनीही या रक्कमांचा दुरुपयोग होणार नाही याबाबत जातीने लक्ष द्यावे.

८. सदर योजनेअंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या शासकीय भागभांडवलाची परतफेड करण्यासाठी शासन निर्णय क्रमांक सुतगि-११९७ (प्र.क्र.१९३) टेक्स-१, दिनांक २४.३.१९९९ अन्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना/अटी व शर्ती या प्रकरणीही लागू राहतील. त्यानुसार शासकीय

पट

भागभांडवलाची गिरण्यांकडून विहित कालावधीत परतफेड होईल, या दृष्टीने संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग यांनी सनियंत्रण करावे. शासकीय दायित्वाची विहीत मुदतीत / वेळोवेळी परतफेड संबंधित सुतगिरण्यांकडून करवून घेण्याची जबाबदारी संचालक / प्रादेशिक उप संचालक यांचेवर राहील व यासाठी त्यांना जबाबदार धरण्यात येईल.

९. आठव्या पंचवार्षिक योजना पूर्वीच्या काळात स्थापित झालेल्या गिरणीच्या पुनर्वसन, आधुनिकीकरण व विस्तारीकरणासाठी निगमाच्या आकृतिबंधानुसार वित्तीय सहाय्य करणे अपेक्षित आहे. गिरण्यांना संबंधित योजनेखाली. निगमामार्फत मंजूर होणारे मुदती कर्ज/गुंतवणूक कर्ज निगमाच्या अटी व शर्तीनुसार मुदती कर्ज /शासकीय भागभांडवल स्वरुपात गिरण्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

१०. निगमाच्या आधुनिकीकरण, विस्तारीकरण, पुनर्वसन यासाठी असलेल्या योजनाखाली गिरण्यांना निगमामार्फत आकृतिबंधानुसार मंजूर झालेल्या कर्जाची परतफेड करणे निगमाच्या अटी व शर्तीनुसार संबंधित गिरण्यांवर बंधनकारक राहील.

११. सातव्या पंचवार्षिक योजनांच्या कालावधीत प्रस्थापित झालेल्या ओपन एण्ड प्रकारच्या गिरण्यांना २५,०००/- चात्यांची जोड देण्यास शासन याव्दारे मंजुरी देत असून, या गिरण्यांचे प्रकल्प अहवाल विस्तारीकरण या कार्यक्रमाखाली सादर करण्यात यावेत. पहिल्या टप्प्यात १२,५०० चात्यांची गिरणी प्रस्थापित करण्यासाठी अर्थसहाय्याचा विचार करण्यात येणार असल्याने प्रकल्प अहवालात पहिला टप्पा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारे अर्थसहाय्य व दुसरा टप्पा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारे अर्थसहाय्य अलगरित्या दर्शविण्यात यावे.

१२. निगमाच्या आधुनिकीकरण, विस्तारीकरण तसेच पुनर्वसनाच्या योजनेअंतर्गत आकृतीबंधानुसार आवश्यक असणा-या शासनाच्या सहभागासाठी देय रक्कमा वार्षिक योजनेत उपलब्ध होणा-या नियतव्ययाचे मर्यादेत राहतील.

हे आदेश नियोजन विभागाच्या सहमतीने तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १३२१/व्यय-२ दिनांक १०.११.२००० अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( ज.कि. मगरे )
उप सचिव,महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग.

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव

२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

३) मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२

४) मा.राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
५) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७) सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य,जुने सचिवालय, सिव्हील लाईन्स,नागपूर
९) कार्यकारी संचालक,राष्ट्रीय सहकारी विकास निगम-४,सिरी इन्स्टिटयूशनल एरिया,हौजखास,नवी दिल्ली-११० ०१६,
१०) रिजनल डायरेक्टर, राष्ट्रीय सहकारी विकास निगम,क्षेत्रिय कार्यालय(पश्चिम) ५,बी.जे.रोड, पुणे -४११००१.
११) अध्यक्ष, सर्व सहकारी सूत गिरण्या
१२) सर्व प्रादेशिक उपसंचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग
१३) सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था
१४) वित्त विभाग,(कार्यासन व्यय-२/अर्थोपाय शाखा/अर्थसंकल्प-१२)
१५) नियोजन विभाग (का.१४)
१६) कार्यासन अधिकारी(रोखशाखा),सहकार व वस्त्रोद्योग विभाग
१७) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी सूत गिरण्यांचा महासंघ मर्यादित, वकील हाऊस,दुसरा मजला,१८ स्प्रॉट रोड,बेलार्ड इस्टेट,मुंबई ४०० ००१
१८) महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य-१ मुंबई/महाराष्ट्र राज्य-२,नागपूर (प्रत्येकी ३ प्रती)
१९) महालेखापाल (लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य- १,मुंबई/महाराष्ट्र राज्य-२,नागपूर (प्रत्येकी ३ प्रती)
२०) निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई
२१) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
२२) सर व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, मुंबई ४०० ०२३.
२३) कार्यासन १७ सी, ६-सी , सहकार व वस्त्रोद्योग विभाग
२४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२५) निवड नस्ती.

## परिशिष्ट "अ"

राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने त्यांचे दिनांक १५.३.२००० चे परिपत्रक व दिनांक ३.७.२००० च्या पत्रात विश्लेषित केलेल्या योजना खालील प्रमाणे आहेत. (त्वरित संदर्भासाठी राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या वरील पत्राच्या मूळ इंग्रजी प्रती सोबत जोडलेल्या आहेत.)

**(अ) नवीन गिरण्यांसाठी :-** राष्ट्रीय सहकारी विकास निगम कापूस उत्पादकांच्या नवीन गिरण्या उभारणीसाठी राज्य शासनाला भागभांडवलाचा वाटा उचलण्यासाठी गुंतवणूक कर्ज देणार आहे. यासाठी पात्र ठरणा-या गिरण्यांनी वित्तीय संस्थांशी कर्ज उभारणीबाबत आर्थिक करार केलेला असला पाहिजे. असे गुंतवणूक कर्ज २५००० चात्या असणाऱ्या गिरण्यांनाच उपलब्ध करुन देण्यात येईल तथापि, निगम अशा गिरण्यांना दीर्घ मुदती कर्ज उपलब्ध करुन देणार नाही. याशिवाय ज्या गिरण्यांची स्थापित क्षमता २५००० चात्यांपेक्षा कमी आहे (ओपन एन्ड किंवा पर्यायी प्रकल्पांच्या गिरण्या आहेत.) अशा गिरण्यांना देखील राष्ट्रीय सहकारी विकास निगम त्यांची क्षमता २५००० चात्यांपर्यन्त वाढविण्यासाठी गुंतवणूक कर्ज उपलब्ध करुन देणार आहे. त्यासाठी या गिरण्या कापूस उत्पादकांच्या असल्या पाहिजे अशी अट नाही.

**(ब) आधुनिकीकरणासाठी :-** राष्ट्रीय सहकारी विकास निगमाचा या योजनेचा उद्देश राज्यातील स्थापित सहकारी सूत गिरण्यांच्या आर्थिक व तांत्रिक सुधारणा आणणे असा आहे. यासाठी असलेल्या निगमाच्या अटी थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत :-

गिरणी ७ वर्षापासून उत्पादनाखाली असली पाहिजे. ( ही अट प्रगतीनुसार शिथिलक्षम आहे.) निगमाचे अर्थसहाय्य गरजेनुसार व टप्प्याटप्प्याने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. अर्थसहाय्य गिरणीची आर्थिक स्थिती, कामकाज, गिरणीची पूर्वपिठीका, घेतलेल्या कर्जाची परतफेड याबाबतचा अभिलेख याबाबी विचारांत घेऊन अर्थसहाय्य करण्यात येईल. त्यासाठी गिरणीने आधुनिकीकरणासाठी आवश्यक प्रकल्प अहवाल तयार करणेही आवश्यक आहे. कापूस उत्पादकांच्या गिरण्यांसाठी गिरणीचा एनडीआर पॉझीटीव्ह असण्याची आवश्यकता नाही. तथापि, इतर गिरण्यांच्या बाबतीत एनडीआर पॉझीटीव्ह असणे आवश्यक आहे.

**(क) विस्तारीकरणासाठी :-** कापूस उत्पादकांच्या काही निवडक गिरण्यांना त्यांच्या उत्पादित केलेल्या मालाला चांगला भाव यावा या दृष्टीकोनातून या योजनेखाली अर्थसहाय्य करण्यात येईल. यासाठी आधुनिकीकरणासाठी असलेल्या निगमाच्या अटी व शर्ती येथेही लागू राहतील.

**(ड) पुनर्वसनासाठी :-** या योजने अंतर्गत जुन्या गिरण्यांना अर्थसहाय्य पॅकेज स्वरुपात प्राप्त होणार आहे. राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या अटीच्या अधिनतेने कापूस उत्पादकांच्या सहकारी सूत गिरण्यांना या योजने अंतर्गत लाभ घेता येईल. इतर गिरण्यांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी त्यांचा नेटवर्थ पॉझीटीव्ह असणे गरजेचे आहे. त्यासाठी अशा प्रकारच्या गिरण्यांनी घेतलेल्या मुदती कर्जाचे रुपांतर शासनाने भागभांडवलात करुन गिरण्यांचा नेटवर्थ पॉझीटीव्ह केल्यास या योजने अंतर्गत त्या गिरण्यांना लाभ घेता येणे शक्य होईल.

आठव्या योजनेपूर्वीच्या (जुन्या) गिरण्यांना अर्थसहाय्य पुनर्वसन योजना पॅकेज स्वरुपा राहणार असून यात राज्य शासन, सहकारी विकास निगम व वित्तीय संस्था यांचा समावेश राहणार आहे. सर्व साधारणपणे खालील बाबींचा समावेश पुनर्वसन पॅकेज योजनेत राहील.

१) आधुनिकीकरण, विस्तारीकरण व दुरावा रक्कम यासाठी राज्य शासनामार्फत मध्यम मदुती कर्ज व गुंतवणूक कर्ज उपलब्ध करुन देणे.

२) वित्तीय संस्थांचे थकीत कर्ज हप्ते बांधून परतफेड करणे, व्याजाच्या दरात सवलत देणे, दंडनिय व्याज माफ करणे व इतर नुकसान भरपाई पोटी आकारलेल्या रक्कमा क्षमापित करणे इत्यादीसाठी दुरावा रक्कम खेळते भागभांडवल व अर्थोपाय अग्रिम या स्वरुपात मदत करणे.

३) नवीन कर्जासाठी शासन थकहमी देणे, कर्जाचे भागभांडवल स्वरुपात रुपांतर करणे अतिरिक्त भागभांडवल उपलब्ध करुन देणे, थकीत रक्कमांचे हप्ते बांधून देणे, व्याज क्षमापित करण विविध आकारापोटी थकलेल्या रक्कमा क्षमापित करणे/सवलती देणे.

४) विविध विषयाशी संबंधित अटी, शर्ती व निकष या व्यतिरिक्त व्यवस्थाप प्रबंधाचा अंतर्भाव या बाबीचे पालन सर्व संबंधितांना, शासन, वित्तीय संस्था, संबंधित सं कर्मचारी यांना करणे.

आजारी असलेल्या सहकारी सूत गिरण्यांना अर्थसहाय्य करण्यासाठी राष्ट्रीय सहाकरी विका निगमाने घालून दिलेले निकष खालील प्रमाणे आहेत :-

१) ज्या गिरण्यांना निगमाने यापूर्वी अर्थसहाय्य केले आहे, व अर्थसहाय्य मर्यादा रुपये ५ कोटी अगर त्यापेक्षा जास्त आहे अशाच गिरण्यांना अर्थसहाय्य करण्यांत येईल.

२) कापूस उत्पादक सभासदांचे गिरणीशी संबंध प्रस्तावित असले पाहिजेत. प्राधान्याने कापूस उत्पादक सभासदांच्या बाबतीत.

३) एखादी गिरणी आजारी म्हणून घोषित करावयाची असल्यास खालील बाबी पैकी कोणती एक बाब वस्तुस्थितीस धरुन असावी.

(अ) गिरणी सतत ३ वर्षापासून रोख तोटयात आहे,

(ब) गिरणीच्या संचित तोटयामुळे गिरणीचे नक्तमूल्य उणे झाले आहे.

४) गिरणी दोन वर्षापेक्षा जास्त बंद राहता कामा नये.

५) १० वर्षापूर्वीच्या गिरण्यांनाना पुनर्वसन कर्ज देतांना आधुनिकीकरणाचा विचार करण्यात येईल. तथापि, १० वर्षापेक्षा कमी कालावधीतील गिरणीच्याबाबतीत पुनर्वसनासाठी अर्थसहाय्याचा विचा करता येईल.

## परिशिष्ट ब

राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या दिनांक १५/३/२००० च्या परिपत्रकान्वये जाहीर केलेल्या व निगमाच्या दिनांक ३.७.२००० च्या पत्रान्वये विश्लेषीत केलेल्या विविध योजनांतर्गत सहकारी सुत गिरण्यांना करावयाच्या अर्थसहाय्याचा आकृतिबंध :-

अ) **कापूस उत्पादकांच्या गिरण्यांबाबत**

१) नवीन गिरण्यांसाठी

| | |
|---|---|
| सभासदांचा सहभाग | १० टक्के |
| राष्ट्रीय सहकारी विकास निगमामार्फत | प्रकल्प खर्चाच्या २० टक्के किंवा राज्य शासनामार्फत संस्थेस द्यावयाच्या शासकीय भागभांडवलाच्या ५० टक्के यापैकी जी कमी असेल ती रक्कम. |
| राज्य शासनामार्फत | ४० टक्के भागभांडवल |

२) आधुनिकीकरणासाठी/ विस्तारीकरणासाठी

| | |
|---|---|
| मुदती कर्ज (संस्थेने वित्तीय संस्थांकडून उभारावयाचे ) | ६० टक्के |
| राष्ट्रीय सहकारी विकास निगमामार्फत द्यावयाचे गुंतवणूक कर्ज | ३० टक्के |
| सभासदांचा सहभाग | १० टक्के |

ब) **हातमाग विणकरांच्या गिरण्यांसाठी**

१) नवीन गिरण्यांसाठी

| | |
|---|---|
| राष्ट्रीय सहकारी विकास निगमामार्फत राज्य शासनास कर्ज | एकूण प्रकल्प खर्चाच्या २२.५ टक्के किंवा शासकीय भागभांडवलाच्या ५० टक्के यापैकी जी कमी असेल ती रक्कम. |
| राज्य शासनामार्फत संस्थेस कर्ज | एकूण भागभांडवलाच्या ५० टक्के पर्यन्त वजा सभासदांचा सहभाग तो किमान ५ टक्के असावा |
| सभासदांचा सहभाग | ५ टक्के |

२) आधुनिकीकरणासाठी

| | |
|---|---|
| राष्ट्रीय सहकारी विकास निगमामार्फत राज्य शासनास कर्ज | ९० टक्के पर्यन्त |
| शासनामार्फत संस्थेस कर्ज स्वरुपात, | ८० टक्के |
| शासनामार्फत संस्थेस भागभांडवल स्वरुपात | २० टक्के (यामध्ये शासनाच्या साधन सामुग्रीमधून १० टक्के उपलब्ध करुन देणे अपेक्षित) |

३) विस्तारीकरणासाठी

| | |
|---|---|
| राष्ट्रीय सहकारी विकास निगमामार्फत राज्य शासनास कर्ज | ७७.५० टक्के |
| राज्य शासनामार्फत संस्थेस कर्ज | ६० टक्के |
| राज्य शासनामार्फत संस्थेस भागभांडवल | ३५ टक्के ( यामध्ये राज्य शासनाने १७.५ टक्के पर्यन्त स्वतःच्या साधनसामुग्रीमधून उपलब्ध करुन देणे आवश्यक) |

| | |
|---|---|
| सभासदाचा सहभाग | ५ टक्के |

क) **<u>यंत्रमाग विणकरांच्या सहकारी सुत गिरण्यांसाठी</u>**

१) <u>नवीन गिरण्यांसाठी</u>

| | |
|---|---|
| राष्ट्रीय सहकारी विकास निगमामार्फत राज्य शासनास कर्ज | प्रकल्प किंमतीच्या २० टक्के किंवा शासव भागभांडवलाच्या ५० टक्के यापैकी जी क असेल ती रक्कम. |
| राज्य शासनामार्फत संस्थेस कर्ज. | एकूण भागभांडवलाच्या ४० टक्के |

२) <u>आधुनिकीकरणासाठी</u>

| | |
|---|---|
| राष्ट्रीय सहकारी विकास निगमाकडून राज्य शासनास कर्ज | ८७.५ टक्के |
| राज्य शासनाकडून संस्थेस कर्ज | ८० टक्के |
| राज्य शासनाकडून संस्थेस भागभांडवल | १५ टक्के ( यापैकी ७.५ टक्के रक्कम रा शासनाने स्वतःच्या साधनसामुग्रीतून उपल देणे आवश्यक.) |
| सभासदांचा सहभाग | ५ टक्के. |

३) <u>विस्तारीकरणासाठी</u>

| | |
|---|---|
| राष्ट्रीय सहकारी विकास निगमाकडून राज्य शासनास कर्ज स्वरुपात. | ७५ टक्के |
| राज्य शासनामार्फत संस्थेस कर्ज | ६० टक्के |
| राज्य शासनामार्फत संस्थेस भागभांडवल | ३० टक्के ( यामध्ये राज्य शासनाने १५ ट साधनसामुग्रीतून उपलब्ध करणे आवश्य |
| सभासदांचा सहभाग | १० टक्के. |